

उदंड स्थळी उदंड प्रसंग | जाणोनि करणे येथासांग |
प्राणीमात्राचा अंतरंग | होऊन जावे ||

# रामदास काय म्हणाले?

गिरीश श्री. बापट

उदंड स्थळीं उदंड प्रसंग। जाणोनि करणें येथासांग।
प्राणीमात्राचा अंतरंग। होऊन जावें।। १३.१०.२७

*प्रपंच आणि परमार्थ दोन्ही करावे असे समर्थ वारंवार सांगतात. या ओवीमध्ये महंताने हे दोन्ही कसे करावे ते सांगितले आहे. महंताचा प्रपंच म्हणजे अनेक लोकांना एकत्र करणे व त्यांना भगवद् भजनाला लावणे. हे करत असताना महंताला अनेक ठिकाणी जावे लागेल. अनेक पेच-प्रसंग सोडवावे लागतील. प्रत्येक स्थळी आणि प्रत्येक प्रसंगी काय केले पाहिजे ते समजून घेऊन त्याने त्या प्रसंगातून वाट काढण्यासाठी जे करणे आवश्यक असेल ते सर्व काही म्हणजे यथासांग करावे. महंताचा परमार्थ म्हणजे त्याने सर्व माणसांचा आणि त्याबरोबर सर्व पशुपक्षांचा भाव ओळखून त्या त्या वेळी सर्वांच्या हिताचे जे असेल ते करावे. यालाच सर्वांचा अंतरंग होऊन जावे असे म्हटले आहे.*

# रामदास
# काय म्हणाले ?

: संकलक :
वाचस्पती गिरीश श्री. बापट

ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, पुणे
(केवळ अंतर्गत वितरणासाठी)

©

| | | |
|---|---|---|
| प्रकाशक | : | कार्यवाह<br>ज्ञान प्रबोधिनी<br>५१०, सदाशिव पेठ,<br>पुणे ४११ ०३० |
| दूरभाष | : | २४२०७००० |
| ई-मेल | : | prabodhini@vsnl.com |
| प्रथम आवृत्ती | : | शके १९२१  ५०० प्रती |
| द्वितीय आवृत्ती | : | सौर चैत्र २९, शके १९२९ १००० प्रती<br>अक्षयतृतीया (१९ एप्रिल २००७) |
| मुद्रक | : | प्रबोध उद्योग, पुणे |
| मूल्य | : | रु. साठ फक्त<br>केवळ अंतर्गत वितरणासाठी<br>दुकानात विक्रीसाठी नाही |

# अनुक्रमणिका


- भूमिका / पान ४
- धर्मसंस्थापनेचे आधुनिक स्वरूप / पान ६
- संकलनाचे सूत्र / पान ११
- दासबोधातील निवडक समासांमधील ओव्या

| | | दशक | समास | पान क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | संपन्न व्यक्तिमत्वाचे गुण | २ | ८ | १८ |
| २. | नि:स्वार्थी लोकनेत्याची लक्षणे | २ | ९ | २१ |
| ३. | देवभक्ती हाच पाया आणि कळस | ३ | ० | २४ |
| ४. | देव हा एकमेव जिवलग मित्र | ४ | ८ | २७ |
| ५. | कार्यसिध्दीसाठी आवश्यक गुण | ८ | ६ | ३० |
| ६. | जो शिकेल त्याची परिस्थिती पालटेल | ९ | ४ | ३३ |
| ७. | वेळेचा पुरेपूर सदुपयोग | ११ | ३ | ३६ |
| ८. | लोकसंग्रहाचा साधकबाधक विचार | ११ | ५ | ४० |
| ९. | आचारशील समाजशिक्षक | ११ | ६ | ४३ |
| १०. | समाजसंघटनेसाठी नेतृत्वविकसन | ११ | १० | ४६ |
| ११. | दारिद्र्याचा त्याग आणि दैवी संपत्तीचा संग्रह | १२ | १ | ५० |
| १२. | माणसांची पारख आणि परिस्थितीची ओळख | १२ | २ | ५४ |
| १३. | सुबुध्द कष्टानेच दैन्य दूर होते | १२ | ९ | ५८ |
| १४. | समाजसंघटनेचे उद्दिष्ट आणि मार्ग | १२ | १० | ६२ |
| १५. | सहृदयता आणि सारासारविवेक | १३ | १० | ६६ |
| १६. | लोक सुखी तर आपण सुखी | १४ | ६ | ७० |
| १७. | आधी लोकांचे सूत्रधार आपलेसे करा | १५ | १ | ७३ |
| १८. | धर्मस्थापना अर्थात प्रत्येकाने स्वत:मधील ईश्वरत्व ओळखणे | १७ | १ | ७६ |
| १९. | अर्जित स्वाधीन गुणांवरच भरवसा | १८ | ३ | ७९ |
| २०. | देवसखा जगमित्र तो लोकांमध्ये अलौकिक | १९ | ४ | ८२ |

# भूमिका

प्रबोधिनीचे संस्थापक कै. वाचस्पती वि. वि. पेंडसे यांनी ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांसमोर समर्थ रामदास, महर्षी दयानंद, स्वामी विवेकानंद आणि योगी अरविंद हे चार राष्ट्रपुरूष भारतीय परंपरेचे आदर्श म्हणून प्रातिनिधिक स्वरूपात ठेवले होते. कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या विचारांचे सखोल अध्ययन मुळापासून करण्याची जिज्ञासा निर्माण व्हावी म्हणून या चारही जणांच्या विचारांचे सार-संकलन केले पाहिजे, असा विचार त्यांनी बोलून दाखविला होता. ज्ञान प्रबोधिनीच्या स्थापनेपूर्वी दहा वर्षे म्हणजे १९५२ मध्येच त्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे संकलन केले होते. 'विवेकानंद काय म्हणाले?' या नावाने ते प्रकाशित केले होते. त्यानंतर १९८२ मध्ये 'श्रीमाताजी, अरविंद काय म्हणाले?' हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले. उरलेल्या दोन राष्ट्रपुरुषांच्या विचारांचे संकलन आपण करावे, अशी जबाबदारी मी आपणहून शिरावर घेतली.

या कामाचा प्रारंभ या छोट्या पुस्तिकेमध्ये समर्थ रामदासांच्या विचारांचे संकलन करून करीत आहे. समर्थ रामदासांचे ग्रंथरूप आणि स्फुट वाङ्मय बरेच आहे. त्यातले सुमारे ७५% स्फुट वाङ्मय व सर्व ग्रंथबध्दरचना पाहिल्यानंतर संकलनाच्या सोयीसाठी फक्त दासबोधातील वेच्यांचे संकलन करायचे ठरवले. रामदासांच्या अनेक स्फुट रचना अतिशय प्रचोदक, चित्तवेधक आणि अभिनव विचार असलेल्या आहेत. परंतु या विचारांचे प्रतिबिंब दासबोधातही कुठे ना कुठे आढळल्यामुळे या संकलनात त्यांचा वेगळा समावेश केला नाही तरी चालेल असे ठरविले.

दासबोधातील वेच्यांची संकलने आजवर अनेकांनी प्रकाशित केली आहेत. त्यांपैकी गुरुदेव रानडे, प्रा. गं. बा. सरदार, डॉ. शं. दा. पेंडसे, आचार्य विनोबा भावे, प्रा. श्री. म. माटे यांची संकलने दासबोधातील विचारांचा विस्तार कळण्यासाठी मला उपयोगी पडली. हे संकलन करतांना प्रत्येक वेचा हा पुरेसा मोठा व संदर्भ लागेल असा असायला हवा, असा एक निकष त्यानंतर निश्चित केला. माझा गणिताकडे थोडा कल असल्यामुळे सार-संकलनात दासबोधातील एकूण ओवीसंख्येच्या साधारण पाच टक्के ओव्या असाव्यात असाही एक निकष ठरविला. याच गणिती हव्यासापायी दासबोधातील एकूण दोनशे समासांपैकी वीस समास निवडून, प्रत्येक समासातील वीस ओव्या असलेले वेचे या संकलनात समाविष्ट केलेले आहेत.

दासबोधाच्या एकूण वीस दशकांपैकी पहिल्या पाच दशकातील एकूण चार समास निवडले आहेत. पुढील पाच दशकांमधून दोन समास निवडले आहेत. पुढील पाच दशकांमधून दोन समास निवडले आहेत. तिसऱ्या पाच दशकांमधून एकूण अकरा समास निवडले आहेत व शेवटच्या पाच दशकांमधून तीन समास निवडले आहेत. मूळ दासबोध पाहिला तर या निवडीच्या विभागणीवरून मला आज कोणते विषय महत्त्वाचे वाटतात, तेही लक्षात येईल. कालांतराने कदाचित ही निवड बदलेलही. परंतु निवड पूर्ण झाल्यानंतर तीन वर्षांनीही त्यात बदल करावासा वाटला नाही, म्हणजे संकलनाचे सूत्र स्थिर आहे. असा विश्वास आल्यावर हे संकलन प्रकाशित करायचे ठरवले.

अशा संकलनाचा उपयोग त्यातील विषयांसंबंधी स्वत:चे चिंतन सुरू व्हायला आणि मूळ ग्रंथ वाचायची प्रेरणा व्हायला होऊ शकतो, या संकलनाच्या प्रत्येक वाचकाने मूळ ग्रंथ पाहून स्वत:च्या सोयीसाठी स्वत:चे संकलन केले तर या माझ्या प्रयत्नांचा हेतू साध्य झाला असे मी मानीन.

**– गिरीश श्री. बापट**

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

पहिल्या आवृत्तीमधील समासांच्या आणि ओव्यांच्या निवडीमध्ये काहीही बदल करण्याची आवश्यकता वाटलेली नाही. दुसऱ्या आवृत्तीमध्ये प्रत्येक पानावर तळटीप म्हणून अपरिचित शब्दांचे व शब्दप्रयोगांचे अर्थ दिले आहेत. तसेच प्रत्येक समासातील दोन ते चार ओव्यांचा स्पष्टीकरणासह अर्थ त्या त्या ओवीखाली दिला आहे. 'धर्मसंस्थापनेचे आधुनिक स्वरूप' या प्रस्तावना–लेखातील काही परिच्छेदांचे पुनर्लेखन त्यांचे वाचन सोपे व्हावे म्हणून केले आहे. या बदलांचा वाचकांना उपयोग होईल असे वाटते.

**– गिरीश श्री. बापट**

समर्थ रामदास, महर्षी दयानंद, स्वामी विवेकानंद,
योगी अरविंद या राष्ट्र पुरुषांनी आपली वाणी,
लेखणी आणि कृतीतून काय सांगितले ?

उपनिषदांचा जीवनादर्श सांगितला.

- अन्धं तम: प्रविशन्ति ये अविद्याम् उपासते।
  जे भौतिक शास्त्रांचीच उपासना करतात
  ते घोर अंध:कारात शिरतात.

- ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रता: ॥
  जे आत्मविद्येचीच उपासना करतात
  ते त्याहून घोर अंध:कारात शिरतात.

- विद्यां च अविद्यां च य: तत् वेद उभयं सह।
  भौतिक शास्त्रे आणि आत्मविद्या या दोन्हींना जो जाणतो-

- अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्यया अमृतम् अश्नुते ॥
  -तो भौतिक शास्त्रांच्या साहाय्याने भौतिक जग तरून जाऊन
  आत्मविद्येच्या साहाय्याने अमृतत्व मिळवतो.

ज्ञान प्रबोधिनीने हाच जीवनादर्श मानला आहे.